01-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 31-05-2025 23:06 Page 1



# अहिल्याबाईंचे नारी शक्तीसाठी मोठे योगदान

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत | साखळीत देवी अहिल्याबाई होळकर यांची जयंती

■ टीम दैनिक हेराल्ड



साखळी : देवी अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती समारंभात उपस्थित मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत सोबत इतर मान्यवर व कार्यकर्ते.

**डिचोली, दि. ३१** : देवी अहिल्याबाई होळकर यांनी नारी शक्तीच्या खऱ्या भावनेचे मूर्तिमंत रूप धारण करताना आपल्या लोकांसाठी आईप्रमाणे आपल्या मुलांची काळजी घेणारी तसेच दयाळू आणि न्याय प्रशासन या साठी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यांचे संस्कार विचार आचार सतत स्मरणात ठेवताना राज्याच्या विकासासाठी महिला सत्तीने ताकदीने योगदान द्यावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले.

साखळी येथील रवींद्र भवन येथे देवी अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंती समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा अध्यक्ष गोपाळ सुरलीकर, मंडळ अध्यक्ष रामा नाईक, नगरकध्यक्ष सिद्धी प्रभू, सुलक्षणा सावंत व इतर मान्यवरांची उपस्थिती होती.

सनातन धर्माच्या पुनरुज्जीवनात, विशेषतः प्रतिष्ठित काशी विश्वनाथसह भारतातील पवित्र मंदिरांच्या जीर्णोद्धाराद्वारे त्यांचे अतुलनीय प्रयत्नआगामी अनेक पिढ्यांना प्रेरणा देत असल्याचे स्पस्ट केले.

आम्ही त्यांच्या वारशातून शक्ती मिळविण्यासाठी आणि त्यांनी प्रकाशित केलेल्या मार्गावर चालण्यासाठी वचनबद्ध आहोत. विकसित भारत निर्माण करण्यासाठी आणि आपल्या राज्यालासर्व समावेशक आणि समग्र विकासाकडे नेण्याचा आमचा प्रामाणिक प्रयत्न असून नारी शक्तीनेही त्यात आपले योगदान देण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे डॉ. सावंत म्हणाले.

यावेळी मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या महान कार्याचे अनेक पैलू उलगडून सांगताना त्यांचा आदर्श घेत महिला सत्तीने विविध क्षेत्रात योगदान दयावे. गोवा विकास व मानवी विकसात मोठी उंची गाठत असताना सर्व जनता नारी शक्तीने आपल्या कर्तृत्वात भर घालत कार्यरत राहावे, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. समई प्रज्वलीत करून कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी देवी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे भव्य प्रदर्शन आयोजित केले होते.

पान १ वरून

## पूजा शर्माला क्लीन चीट : आसगाववासीयांचा संताप

सर्व पुरावे असतानाही पूजाचे नाव एफआयआरमध्ये न घेणे म्हणजे कायद्याचा अपमान आहे, असं मत ॲड. सॅव्हियो कोरिया यांनी व्यक्त केले. या प्रकरणात जर तिचे नाव जोडले गेले नाही, तर हे इतरांना देखील अशा पद्धतीने बेदखलीसाठी प्रेरित करेल, असा इशाराही त्यांनी दिला.

पूजा शर्मा यांचे पती एक वरिष्ठ राजनयिक असून, त्यांच्या संपर्कांचा वापर करूनच पोलिस तपासावर प्रभाव टाकण्यात आला असावा, असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. मुख्यमंत्री स्वतः पावसात उभे राहून आगरवाडेकर कुटुंबाला मदतीचे आश्वासन देतात, आणि आता गप्प बसतात. दिल्लीवरून आदेश आल्यावर त्यांचा सूर बदलतो, असा आरोप स्थानिक कार्यकर्ते रामिरो डिसोझा यांनी केला.

घटनेच्या दिवशी सुमारे १५ बाउन्सर्स आगरवाडेकरांच्या असागाव येथील घरात शिरले. त्यांनी तिथे राहत असलेल्या प्रिंशा आगरवाडेकर आणि त्यांच्या कुटुंबीयांना घर खाली करण्यास सांगितले. त्यावेळी बाउन्सर्सनी कोणतेही अधिकृत दस्तऐवज सादर न करता धमकी दिली. जेव्हा प्रिंशाने विध्वंस परवानगी विचारली, तेव्हा तिला ढकलण्यात आले.

पोलिस ठाण्यात प्रिंशा आणि त्यांच्या मुलीला नेण्यात आले असतानाच, त्यांच्या अनुपस्थितीत घराची तोडफोड सुरू झाली. एका बाउन्सरने जेसीबीच्या चाव्या घेऊन काम सुरू केल्याचा आरोपही प्रिंशाने केला. या वेळी पोलिसांनी बाउन्सर्सना अटक करण्यास नकार दिला आणि केवळ माती काम करणाऱ्या यंत्राच्या चाव्या जप्त केल्या.

घटनेदरम्यान प्रिंशाच्या १९ वर्षीय मुलाला आणि त्यांच्या आजारी पतीला बळजबरीने गाडीत टाकून सहा तास वेगवेगळ्या ठिकाणी फिरवले गेले. शेवटी रात्री १०.३० वाजता हणजूण येथील एका बारजवळ त्यांना सोडण्यात आले. त्यांच्या जबाबाची नोंदही करण्यात आली नव्हती.

सध्या आगरवाडेकर कुटुंब एका तात्पुरत्या निवासात राहत आहे. त्यांना फक्त एक खोली आणि एक स्वयंपाकघर शिल्लक राहिले आहे. स्थानिक रहिवाशांनुसार, कुटुंब आता प्रसारमाध्यमांपासून दूर राहत असून, या प्रकरणावर बोलण्यास टाळाटाळ करत आहे. कुटुंब काहीसे गप्प झाले आहे. कदाचित त्यांना त्रास नको आहे, असे एका शेजाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. आसगावकरांनी या प्रकरणात योग्य न्याय व्हावा आणि दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी केली आहे. एफआयआरमधून पूजाचे नाव काढणे म्हणजे कायद्याच्या मूलभूत तत्त्वांना धक्का देणे आहे. प्रशासनाने या प्रकरणाचा पुनर्विचार करून तिच्या विरोधात कारवाई करावी, असं ग्रामस्थ मागणी करत आहेत.

# अहिल्याबाई होळकर यांची जयंती काणकोण येथे साजरी



काणकोण : अहिल्याबाई होळकर ३००वी जयंतीनिमित्त कार्यक्रमात सभापती रमेश तवडकर, प्रभाकर गावकर, विशाल देसाई, महिला मोर्चा काणकोण पदाधिकारी.

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१** : काणकोण भाजपा महिला मोर्चातर्फे शक्ती, भक्ती आणि नीतिमान नेतृत्वाचे कालातीत प्रतीक असलेल्या पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती साजरी करण्यात आली.

गोवा विधानसभेचे माननीय अध्यक्ष आणि काणकोणचे आमदार डॉ. रमेश तवडकर यांच्या उपस्थितीत, पैंगीणच्या सरपंच आणि श्री बलराम निवासी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती. सविता तवडकर, भाजप काणकोण महिला मोर्चा अध्यक्षा श्रीमती विंदा सातारकर, भाजपा काणकोण मंडळ अध्यक्ष श्री प्रभाकर गावकर, माजी अध्यक्ष विशाल देसाई, भाजपा गोवा महिला मोर्चा उपाध्यक्षा श्रीमती. चंदा देसाई, नगरसेविका नितू देसाई, डॉ. पुष्पा अय्या, अन्य भाजप महिला मोर्चा प्रमुख कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

याप्रसंगी श्रीमती. सविता तवडकर यांनी पुण्यश्लोक लोकमाता अहिल्याबाई होळकर जी यांची प्रेरणादायी जीवनकहाणी विविध घटना सांगितल्या.डॉ. रमेश तवडकर यांनी भारतीय इतिहासातील त्यांच्या असाधारण योगदानाबद्दल आणि भक्ती आणि ज्ञानाने आपल्या लोकांची सेवा करणाऱ्या प्रेरणादायी महिला नेत्या म्हणून त्यांच्या वारशाबद्दलही माहिती दिली. विंदा सतरकर यानी स्वागत तर चंदा देसाई यानी आभार प्रकट केले.

# गोमंतक मराठी अकादमीतर्फे 'पुस्तक चर्चा' कार्यक्रम रंगला



पर्वरी : पुस्तक चर्चा कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र केरकर यांच्या समवेत चित्रा क्षीरसागर, प्रभाकर ढगे, लेखक चंद्रशेखर गांवस, विठ्ठल गांवस, डॉ. बिभिषण सातपुते व कविता आमोणकर.

■ टीम दैनिक हेराल्ड

**नावेली, दि. ३१** : साहित्य हे समाजाचा आरसा असते आणि या साहित्यातून लेखक समजाप्रती बोथट झालेल्या संवेदना जाग्या करत असतो. वेगवेगळ्या विषयाच्या मागे लागून ते विषय जर आपल्या लेखात मांडले. तर चांगले बीज साहित्यात निर्माण होते. गोव्यासारखा एक छोटासा प्रदेश वैविध्यपूर्ण असून याचे दर्शन लेखक चंद्रशेखर गावस यांच्या प्रत्येक लेखात होते, असे उद्‌गार ज्येष्ठ साहित्यकार, तसेच पर्यावरणवादी राजेंद्र केरकर यांनी काढले.गोमंतक मराठी अकादमी, पर्वरीतर्फे आयोजित पुस्तक चर्चा या कार्यक्रमांतर्गत लेखक चंद्रशेखर गांवस यांच्या माझी भावस्पंदने या पुस्तकावर राजेंद्र केरकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर साहित्यिक चित्रा क्षीरसागर, कार्यक्रमाचे समन्वयक ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर ढगे, लेखक चंद्रशेखर गांवस यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाअंतर्गत चंद्रशेखर गांवस यांचा अध्यक्ष राजेंद्र केरकर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.महानगरीय बदलत्या समाजव्यवस्थेमध्ये सामाजिक, सांस्कृतीक पर्यावरणामध्ये संवेदशील माणसाची होणारी कोंडी चंद्रशेखर गांवस यांनी आपल्या पुस्तकात चित्रीत केली आहे. काही लेखांमध्ये कथेचे बीज आढळते असे चित्रा क्षीरसागर आपल्या भाषणात म्हणाल्या.कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक करताना प्रभाकर ढगे म्हणाले की, गोमंतक मराठी अकादमी तर्फे आयोजित केलेल्या पुस्तक चर्चा कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून या उपक्रमाअंतर्गत समाजाची साहित्याप्रती रुची वाढत आहे. आपल्या मनोगतात लेखन चंद्रशेखर गांवस यांनी कोविड काळात हे लेख लिहिले गेल्याचे संगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता आमोणकर यांनी केले तर आभार प्रभाकर ढगे यांनी मानले,

# डिचोली महिला मोर्चातर्फे अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ३१**: येथील पंडित दीनदयाळ उपाध्याय हॉलमध्ये भारतीय जनता पार्टी डिचोली मंडल कमिटी आणि भारतीय जनता पार्टी डिचोली महिला मोर्चातर्फे पुण्यश्लोक महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त त्यांच्या वैभवशाली कार्याचा उचित गौरव करणारा कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रभारी आरती बांदोडकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी त्यांच्या उद्बोधन पर भाषणात महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्याचा यथोचित गौरव करून आजच्या युगातील महिलांनी सक्षमपणे संसार आणि उद्योग संभाळून समाजात आपले स्थान बळकट करावे हा संदेश दिला.

प्रमुख वक्त्या म्हणून डिचोली येथील शिक्षिका वर्षा धुपकर यांना आमंत्रित केले होते. त्यांनी महाराणी अहिल्याबाई होळकर यांचा जीवन संघर्ष अगदी सोपेपणाने महिलांना उलगडून दाखवला. त्याचबरोबर त्यांच्या जीवनातील चढउतार आणि संसारिक अडचणी यांच्याशी तोंड देऊन राणीसाहेबांनी सर्वसामान्य प्रजेची काळजी कशी सक्षमपणे घेतली याचाही आढावा घेतला. आजच्या युगातील महिलांनी आपला संसार आणि उद्योग संभाळताना अहिल्याबाईंची शिकवण कशी आचरणात आणावी याबद्दल योग्य ते मार्गदर्शन केले.

डिचोली मंडल कमिटी अध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर यांनी योग्य, असे प्रास्ताविक केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने डिचोली मुनिसिपल कौन्सिल भागातील महिलांसाठी तांदळापासून बनवलेली पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्याला शहरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन ३५ विविध पाककला प्रस्तुत केल्या. डिचोलीतील प्रसिद्ध शेफ अजिंक्य नेवगी आणि नगरसेविका दीपा शिरगावकर यांनी परीक्षण केले आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना बक्षीसे वितरित केली गेली.

पुण्यश्लोक महाराणी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावरील प्रश्नोत्तराच्या आणि इतर स्पर्धांमध्ये महिलांनी सहभाग घेऊन पारितोषिके मिळवली. या विशेष कार्यक्रमाला भाजपा उत्तर गोवा अध्यक्ष श्री दयानंद कारबोटकर, सरचिटणीस श्री विश्वास गावकर, डिचोली महिला मोर्चा अध्यक्ष शर्मिला पळ, उपाध्यक्ष सपना शिरोडकर, मंडल जनरल सेक्रेटरी संजय शेटये, संजय म्हापसेकर, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, उपनगराध्यक्ष दीपा पळ, मंडल सेक्रेटरी ॲड. केदार शिरगावकर मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. विदिशा बुगडे आणि आभार प्रदर्शन सौ अर्चना गायकवाड यांनी केले. डिचोलीचे आमदार डॉक्टर चंद्रकांतजी शेटये यांचे या विशेष कार्यक्रमाला सर्वतोपरी असे सहकार्य लाभले. डिचोली नगर पालिकेच्या सर्व महिला नगरसेविकांनी, भाजपा महिला मोर्चाच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी ह्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

# काणकोण पत्रकार संघातर्फे आरोग्य शिबिराला प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ३१** : काणकोण येथील नागरिकांना हृदयरोग व अन्य व्याधींवर उपाय करण्याहेतू मडगाव शहरात जावे लागते आहे. त्यामुळे अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो. त्याकरता आपण इ.सी.जी. मशीन मोफत देणार आहे. आठवड्यातून किमान एक दिवस काणकोणात आपण सेवा द्यायची तयारी ठेवली आहे, असे विचार मडगावचे सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. मिलिंद देसाई यांनी व्यक्त केले.

काणकोण पत्रकार संघातर्फे आज दि.३० रोजी, चार–रस्ता काणकोण येथील आसरा गृहाच्या सभागृहात आयोजित हृदयरोग व मधुमेह रुग्णाकरता आरोग्य शिबीराचे आयोजन केले होते. यावेळी उद्घाटन कार्यक्रमात डॉ.देसाई उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते.

यावेळी व्यासपीठावर त्यांच्यासह, नगराध्यक्षा सारा देसाई, नगरसेवक हेमंत नाईक गावकर, संघाचे उपाध्यक्ष बबेश बोरकर, जेष्ठ पत्रकार अजित पैंगीणकर व अन्य उपस्थित होते.

बबेश बोरकर यांनी उपस्थित मान्यवर व अन्य यांचे स्वागत केले. समई प्रज्वलित करून शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

सुभाष महाले. अजित पैंगीणकर व नारायण देसाई यांनी यांनी व्यासपीठावरील मान्यवरांचे व अन्य वैद्यकीय डॉ व कर्मचारी यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना डॉ.मिलिंद देसाई यांनी पत्रकार संघाच्या सफलतापुर्वक आयोजनाबद्दल कौतुक केले.

नगराध्यक्षा सारा देसाई यावेळी म्हणाल्या कि काणकोण पत्रकार संघाचे सदस्य पत्रकारितेबरोबरच आरोग्य, क्रीडा क्षेत्रात योगदान देऊन समाजाप्रती कर्तव्य सेवा देत आहेत. पत्रकार संघाला यापुढेही आपले सहकार्य असणार आहे.

काणकोणच्या पत्रकार संघाचे हे कार्य खूप मोठे आहे.यामधून समाजाप्रती संवेदनशील असल्याचे दिसून येते. पत्रकार संघाला आपल्याकडून आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य आपण देणार असल्याचे नगरसेवक हेमंत नाईक गावकर म्हणाले.

या आरोग्य शिबीरात डॉ . मिलिंद देसाई, शहनाज खान , आश्रया बोरकर, शिवानी नाईक, अब्दुल सनदी, लुविनेन, केलेईन, शुभांगी पागी, या डॉ, पारिचारिका, तंत्रज्ञ आदींचा समावेश होता. एकूण ६६ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोमरपंत तर आभार नारायण देसाई यांनी व्यक्त केले.


केनरा बैंक Canara Bank — भारत सरकार का उपक्रम — A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**शाखा कार्यालय : कुडचडे (17203)**

**मागणी सूचना**

**श्री. अर्शद एजन्सीज,** गाळा क्र. 3, काकोडा सेंटर, सासनमड्डी, काकोडा, कुडचडे, गोवा 403706., **श्री. अजिज बशीर अहमद कित्तूर, प्रोप्रा. : मे. अर्शद एजन्सीज,** फ्लॅट क्र.जी–1, काकोडा सेंटर को–ऑप. हाऊसिंग सोसायटी, सासनमड्डी, काकोडा, कुडचडे, गोवा 403706., **श्रीमती फौजिया अजीज कित्तूर,** फ्लॅट क्र.जी–1, काकोडा सेंटर को–ऑप. हाऊसिंग सोसायटी, सासनमड्डी, काकोडा, कुडचडे, गोवा 403706., **श्री. अल्लाबक्ष बशीर कित्तूर (हमीदार), प्रोप्रा. : कित्तूर ट्रेडर्स,** न्यू मार्केट, कुडचडे, कुडचडे, गोवा–403706.
**प्रिय महोदय,**
**विषय : सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13(2) खाली मागणी सूचना**
की, **श्री. अजिज बशीर अहमद कित्तूर, प्रोप्रा. : मे. अर्शद एजन्सीज (कर्जदार) व श्रीमती फौजिया अजीज कित्तूर (हमीदार) आणि श्री. अल्लाबक्ष बशीर कित्तूर (हमीदार)** यांनी आमच्या कुडचडे शाखेतून खालील कर्जे क्रेडिट सुविधा घेतलेल्या आहेत.

| कर्जाचे स्वरूप | कर्ज रक्कम | 30.04.2024 रोजी दायित्व | व्याज दर |
|---|---|---|---|
| खेळते भांडवल | रु. 13,00,000 | रु. 22,52,877.36/- + न आकारलेले व्याज | 13.25 % |

वरील सदर कर्ज /क्रेडिट सुविधा येथे खाली वर्णिलेल्या अनुसूचीत अधिक विस्ताराने दिलेल्या मालमत्तांच्या गहाणवटीद्वारे सुरक्षित केल्या आहेत ज्या नुसार ामच्या नावे संबंधित दस्तावेज करारबद्ध केला आहे. बँकेने विरहित केलेल्या अटी व शर्ती नुसार तुमची दायित्वे पार पाडण्यात तुम्ही अपयशी ठरल्याने सदर कर्ज एनपीए म्हणून 30.01.2021 रोजी वर्ग करण्यात आले आहे. म्हणून, सदर कायद्याच्या कलम 13(2) खाली तुम्हाला याद्वारे नोटीस देण्यात येते की ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत तुम्ही त्यावर साठलेल्या आजमितीसच्या व्याज व इतर खर्चासह **रु. 22,52,877.36/- (रु.बावीस लाख बावन्न हजार आठशे सत्त्याहत्तर व पैसे छत्तीस फक्त)** या दायित्वाची पूर्ती करावी अन्यथा सदर कायद्याच्या कलम 13(4) खाली कोणतेही वा सर्व हक्कांचा आम्ही वापर करू.
तसेच पुढे, आमच्या पूर्व संमतीविना कोणत्याही प्रकारे येथील अनुसूचीत वर्णिलेल्या मालमत्तांबाबत व्यवहार करण्यास तुम्हाला निर्बंधित केले जात आहे. हे सदर कायदा आणि किंवा अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली आम्हाला उपलब्ध असलेल्या कोणत्याही अन्य अधिकारांच्या पूर्वग्रहाशिवाय आहे.
सदर सुरक्षित मत्ता पुन्हा मिळवण्यासाठी सरफासी कायद्याच्या कलम 13 मधील उपकलम (8) मधील तरतुदींकडे आपले लक्ष वळविणयात येत आहे.
ही मागणी सूचना बँकेच्या नोंदीत उपलब्ध असलेल्या तुमच्या मागील ज्ञात पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात आली आहे.
**ही नोटीस आमच्या मागील 08.06.2021 रोजीची मागणी सूचना रद्द करून देण्यात येत आहे.**

**अनुसूची**
**गहाणवट / हायपोथिकेट केलेल्या मत्तांचे विशिष्ट तपशील येथे खाली दिले आहेत.**

**बाबनिहाय गहाणवट / हायपोथिकेट केलेल्या मत्ता : स्थावर मालमत्ता**

**तपशीलवार वर्णन द्यावे** : केपे येथील भू नोंदणी कार्यालयात क्र. 7130, मात्रिज क्र. 657 व काकोडा गावाच्या सर्व्हे क्र. 131-12 खाली संपूर्ण मालमत्ता म्हणून नोंदवलेल्या केपे तालुक्यातील सासनमड्डी, काकोडे येथील स्वतंत्र व वेगळी मालमत्ता म्हणून वर्णिलेल्या 996 चौ.मी. क्षेत्रफळाच्या काकोडे येथील सासनमड्डी नावाच्या मालमत्तेचा भाग असलेल्या जमिनीचा प्रमाणित संबंधित अविभाजित हिश्यासह एच अँड एम क्लासिक या नावाच्या इमारतीत तळमजल्यावरील 27.00 चौ.मी. क्षेत्रफळाच्या गाळा क्र. 3 चा संपूर्ण भाग. आणि
**चतु:सीमा : पूर्वेस** : कुचडे काकोडा रस्ता, **पश्चिमेस** : बिल्डींगचा सेटबॅक, **उत्तरेस** : गाळा क्र. 4, **दक्षिणेस** : गाळा क्र. 2.

**दिनांक : 05/05/2025**
**ठिकाण : कुडचडे**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**


# पुरातत्त्व अभ्यास मंडळातर्फे मोरजी परिक्रमा

**▶ राजेंद्र केरेकर यांचे मार्गदर्शन**

■ टीम दैनिक हेराल्ड



मोरजी : परिक्रमा कार्यक्रमांतर्गत सहभागी झालेल्या अभ्यासकांना मार्गदर्शन करताना प्राध्यापक राजेंद्र केरकर.

**पेडणे, दि. ३१** : केरी सत्तरी येथील पुरातत्त्व अभ्यास मंडळातर्फे पंचविसाव्या परिक्रमा कार्यक्रमांतर्गत मोरजी गावातील श्री सतपुरुष मंदिर श्री कानडीवस देवस्थान श्री मोरजाई देवस्थान काळभैरव देवस्थान, दाडोबा देवस्थान आणि खिंड परिसरांना भेटी दिल्या, त्यांनी यावेळी प्रत्येक जागेचे सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतले मंदिराच्या परिसरात असलेल्या पुरातन वृक्षासंबंधी माहिती घेतली प्राध्यापक राजेंद्र केरकर यांनी यावेळी मोरजी गावातील प्रमुख देवस्थानाचा इतिहास विशद केला.

गोवा घटकराज्य दिनाचे औचित्य साधून या विशेष परिक्रमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात गोवा विद्यापीठातील इतिहास विषयाचे अभ्यासक तसेच विविध विषयावर पीएचडी करणारे अभ्यासक ऐतिहासिक दस्तावेज गोळा करणारे अभ्यासक मोठ्या संख्येने या परिक्रमेत सामील झाले होते या पुरातत्त्व अभ्यास मंडळातर्फे आतापर्यंत गोव्याच्या विविध भागात पौराणिक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेटी देऊन त्या स्थळांचा इतिहास जाणून घेतला आहे या इतिहासातून गोव्याचे ऐतिहासिक वैभव आणि वारसा टिकून ठेवण्याचे कार्य केले जात असल्याचे प्राध्यापक राजेंद्र केरकर यांनी यावेळी सांगितले विविध दिवस स्थानाची उत्पत्ती त्यातील उत्सव त्यामागे इतिहास त्यांनी यावेळी विशद केला अगदी शिवाजी महाराजांच्या काळात तसेच त्यापूर्वी अस्तित्वात आलेली गोव्यातील मंदिरे त्या मंदिराच्या पांगणात फुललेली कावीकला शिल्प देवळांची बांधणी यावे याविषयी याविषयी त्यांनी अभ्यासपूर्वक विवेचन केले मोरजाई गावात मोरजी गावाची उत्पत्ती मोरजी गावातील प्रमुख दैवते श्रीदेवी सत्पुरुष देवी मोरजाई काळभैरव देवस्थान ताडोबा देवस्थान मोरजी खिंड या भागांना यावेळी भेटी देण्यात आल्या सदम शेठ म्हणजेच श्रीदेवी सातपुरुष आणि देवी मोरजाई यांनी मोरजी गाव अस्तित्वात आणताना या गावात असलेल्या ३६० देवचारावर अधिपत्य मिळवले देवी मोरजाई म्हणजेच महिषासुर मर्दिनी असा लवकिक या देवतेचा आहे गोव्यातील सात बहिणी पैकी देवी मोरजाई एक आहे काळभैरव म्हणजेच सिद्धनाथ हे देवस्थान गोसावी या समाजाशी संबंधित आहे या गोसावी कुटुंबीयातर्फे या देवस्थानचे उत्सव धार्मिक विधी पार पाडले जातात याच्या या मंदिराला लागूनच वीर म्हणजेच मोरजी ची निर्मिती करताना वीरगती पावलेल्या वीरांचे स्मरण करणारे देवस्थान आहे श्री सतपुरुष मंदिर आणि या मंदिराच्या प्रांगणामध्ये फुललेली कावीकला आजही या ठिकाणी सांभाळून ठेवलेली आहे

यावेळी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना प्राध्यापक राजेंद्र केरकर यांनी योग्य उत्तरे देऊन परिक्रमेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी श्री या फडते हिने विशेष परिश्रम घेतले सुरुवातीला तिने सर्वांचे स्वागत केले शुभदा चारी हिने परिक्रमा आयोजनाचा हेतू विशद करून आतापर्यंत गोव्याच्या विविध भागात २४ ठिकाणी परिक्रमेचे आयोजन करण्यात आले आहे २६ वा परिक्रमा कार्यक्रम पाली येथे आयोजित करण्यात येईल असे यावेळी प्राध्यापक राजेंद्र केरकर यांनी सांगितले यापुढे कोणाला आपल्या गावातील देवस्थानाचा इतिहास जाणून घ्यायचा असेल आणि ज्यांना आपल्या गावात परिक्रमा कार्यक्रमाचे आयोजन करायचे असेल तर त्यांनी पुरातत्त्व अभ्यास मंडळाकडे संपर्क साधावा असे त्यांनी यावेळी सांगितले यापूर्वीच्या परिक्रमेवर विशेष लेखही प्रसिद्ध झाले आहेत अजूनही यासंबंधी कोणाला अभ्यास करावयाचा असेल तर त्यांनी पुरातत्त्व मंडळाकडे संपर्क साधावा असे यावेळी सांगण्यात आले अमेय किंजव डे कर यांनी सर्वांचे आभार मानले मनोहर शेटगावकर सुभाष शेट गावकर पोर्णिमा केरकर विठोबा बगळी यांच्यासह ५५ अभ्यासकांनी या परिक्रमा कार्यक्रमात सहभाग घेतला मोरजी येथील सतपुरुष मंदिराकडून दुपारी तीन वाजता सुरू झालेली ही परिक्रमा मोर्जी खिंड या ठिकाणी सायंकाळी सहा वाजता संपुष्टा आली.